Publication: Lokmat
Date: 1/6/2019
Page: 3
Column: 1

लोकमत मुंबई, शनिवार, दि. १ जून २०१९

# वीज ग्राहकांसाठी नवी हेल्पलाइन

मुंबई : अदानी या खासगी वीज कंपनीने ग्राहकसेवेसाठी १९१२२ हा क्रमांक सेवेत दाखल केला आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशी बहुभाषिक सेवा या क्रमांकावर उपलब्ध आहे. हा क्रमांक दिवसाचे २४ तास उपलब्ध आहे. आग किंवा विजेचा धक्का बसत असल्यास, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे इमारतीतील लिफ्टच्या सुविधेत अडथळा निर्माण झाल्यास, उत्खनन किंवा वीजचोरी झाल्यास, नवीन जोडणी, वीजपुरवठा खंडित होणे यासह पेमेंटशी संबंधित सर्व तक्रारी येथे घेतल्या जातात. दरम्यान, यापूर्वीचा ग्राहकसेवा क्रमांक १८००२००३०३० होता. हा क्रमांकही सध्या सुरु असून, कालांतराने तो बंद करण्यात येईल.